# राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, कोल्हापूर

## मेस व कॅन्टीन निवीदा

अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय कोल्हापूर शेंडापार्क, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय आवार व जिल्हाशल्य चिकित्सक निवास स्थान आवार ( मुलींचे वसतिगृह ) येथील विद्यार्थी व विद्यार्थीनी मेस व कॅन्टीनसाठी अनुभवी मेस व कॅन्टीन चालकाकडून दरपत्रके फक्त ११ महिने कालावधी साठी मागविणेत येत आहेत. इच्छुकांनी रुपये ५००/- (रुपये पाचशें फक्त) रोखीने भरुन अधिष्ठाता कार्यालय ( छत्रपती प्रमिलाराजे कोल्हापूर आवार) येथून दिनांक २१/१२/२०१९ ते दिनांक २७/१२/२०१९ पर्यत सकाळी १०.३० ते ५.३० या वेळेत मिळू शकतील.निविदा भरुन देण्याची अंतिम मुदत दिनांक २७/१२/२०१९ पर्यत ५.००.वाजेपर्यत राहील.(सुट्टीचे दिवस सोडून ) निविदे प्रक्रियेतील पहिला लिफाफा दि. ३०/१२/२०१९ रोजी १२ .०० वाजता अधिष्टाता कार्यालय हॉलमध्ये उघडण्यात येईल यांची संबंधीतांनी उपस्थित राहाणे बंधणकारक आहे.)

टीप :- प्रत्येक मेस व कॅन्टीन साठी स्वतंत्र निवीदा दरपत्रके भरणे अनिवार्य राहील). (उशिरा आलेल्या निवीदा दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.)

शिक्का

R.C.S.M. Govt. Medical College * Kolhapur *

अधिष्ठाता,
राजर्षि छत्रपती शाहु महाराज
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय कोल्हापूर

19/12/2019

19/12

फॉर्म फी
रु ५००/-

महाराष्ट्र शासन
राजर्षि छत्रपती शाहू महाराज,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, कोल्हापूर

दुरध्वनी : ०२३१-२६४१५८३ फॅक्स क्रं. : २६४५२७९

**सदरचा फॉर्म ज्या ठेकेदाराने ज्या नावे घेतले आहे त्याच नावे स्विकारण्यात येईल**

*जेवण व्यवस्थेबाबत दर पत्रक.*

*( दोन लिफाफे ( टु बीड निविदा पध्दती)*

निवीदा धारकाचे/संस्थेचे पुर्ण नाव :-

निवीदाधारकाचे/संस्थेचापुर्णपत्ता :-

दुरध्वनी क्र.:-................मोबाईल क्र...........

**१)शासकीय वैघकीय महाविघालय, (सि पी आर आवार) मेस ठेका**
**२)शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (सी.एस.कॅम्पस आवार)मेस ठेका** -(1)
**३) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (सी.एस.कॅम्पस आवार)मेस ठेका** -(2)
**४)शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (शेंडापार्क आवार) नवीन मेस व कंझ्युमर्स फक्त (महाविद्यालयीन मुलांसाठी( विद्यार्थीसाठी ) महाविद्यालयीन मुलीसाठी जूनी इमारत( विद्यार्थीनी ) )साठी वापरण्याची आहे.**

सकाळी :- ८ ते ११
चहा/कॉफी , दुध-बोर्नविटा, पोहे, उप्पीट, उत्ताप्पा, मेदुवडा, आलुपराठा, आंबोळी, शिरा,आम्लेट -ब्रेड, इत्यादी.

**सकाळी १२ ते २.००**

चपाती/भाकरी ,एक उसळ, एक भाजी (ज्या त्या हंगामात उपलब्ध असतील त्यानुसार) वरण/आमटी,भात कोंशिबीर/ कांदालिंबू,लोणचे, दही/ताक वाटी चटणी.

दुपारी :- ४ ते ६ या वेळेत चहा/कॉफी बटाटा वडा, इडली वडा, वडासांबार, ब्रेडआम्लेट, ॲपे, सामोसा,कचोरी ,पॅटीस,

आठवडयातून फेरबदल करुन( आलटून-पालटून) दोन पदार्थ रोजी ठेवणे

**जेवण वसकाळी व दुपारी नास्टा मासिक दर प्रत्येकी**

रुपये............

(अक्षरी रुपये...............

**संध्याकाळी :- ७ ते १० चपाती,/भाकरी, वरण भात,एकउसळ ,भरलेलेवांगे एक भाजी,कोंशिबीर/कांदालिंबू,लोणचे,पापड,ताक,दही वाटी.**

....................)

**बुधवार:- (आठवडयातून एकदा चेंज)**
**संध्याकाळी-** मांसाहारी, अंडाकरी, रात्री

शुक्रवार :- रात्री अंडाकरी

प्रत्येक आठवडी आलटुन-पालटुल मेणु देणे.

**शाकाहारी:-** आलूपराटा, शेवयाची खिर,कढी, डाळ तडका इत्यादी तत्सम चविष्ट पदार्थ मसालेभात/पुलावा/इतर भाज्याचे पराठा व ओली चटणी दहीवडे/शिरा इत्यादी.

**रविवार:-फीस्ट**-मांसाहारी-चिकन,मटन,फिश इत्यादी (आलटुन पालटुन)

**शाकाहारी:-**पनीरभाजी,श्रीखंड,बासुंदी,गुलाबजाम, फ्रुड सॅलेड, बटाटेवडे (लहान), भज्जी, मसाले भात/ पुलाव, पु-या, इत्यादी तत्सम चविष्ठ पदार्थ,

वरील नमूद केलेल्या सकाळी नास्टा, दुपारी जेवण, सायंकाळी नास्टा व संध्याकाळी जेवण या सर्व मेणू नूसार प्रत्येक दरमहा रक्कम रु......./- (अक्षरी.......................................फक्त) नुसार विद्यार्थ्यांना भोजन देण्याचा ठेका घेण्यास तयार आहे.

प्रमाणित करतो की, भोजन ठेका संदर्भातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून ठेका अस्तीत्वात असे पर्यंत त्या माझ्यावर बंधनकारक आहेत याची मला जाणीव आहे.

दिनांक: / /२० . ( सही व नाव)

ठिकाण:..............

## दोन लिफाफे ( टु बीड ) निविदा पध्दती.

## भोजन व उपहार गृह ठेक्या संदर्भातील नियम व अटी

राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयाच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवण्याचा ठेका देण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निवीदा मागवण्यात येत आहेत. निवीदा देकाराचा कालावधी निवीदा भरण्याच्या अंतीम तारखेपासून एक वर्षांचा राहील. तथापी असमाधानकारक कामकाज पध्दती, असमाधानकारक भोजनाचा असमाधान कारक स्वच्छता,व कामाचा दर्जा इत्यादी कारणांमुळे भोजनठेका केंव्हाही रद्द /खंडीत करण्याचा अधिकार महाविद्यालय प्रशासन/ विद्यार्थी परिषदेला आहे.

**लिफाफा क्रं.१**

**(तांत्रिक निविदाचा लिफाफा या लिफाफयावर लिफाफा क्रं. १ असे लिहावे )**

१) निविदाधारकाचा रहिवाशी दाखला.
२) बयाना रक्कम रु. ५००००/-(अक्षरी रुपये पंन्नास हजार फक्त.) मा. अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांचे नांवाचा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनादेश(डी.डी) सोबत जोडावा.
३) अन्न व औषध प्रशासन खात्याचे प्रमाणपत्र.
४) संस्था व दुकाणे नोंदणीचे प्रमाणपत्र.
५) भोजन ठेका विषयक पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र.
६) विक्रीकर खात्याचे प्रमाणपत्र.

निवीदा सोबत जोडण्यात आलेली सर्व प्रमाणपत्रे सांक्षाकीत असणे आवश्यक आहे. वर नमुद केलेली तांत्रिक माहिती निविदा सोबत केली नसेल तर निवीदा ग्राहय धरली जाणार नाही.

**दोन लिफाफे ( टु बीड ) निविदा पध्दती.**

**लिफाफा क्रं. २ (दरासंबधीचा लिफाफा)**

या लिफाफयावर "लिफाफा क्र. २" असा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यामध्ये भोजन ठेक्याचा दर नमूद करण्याचा आहे विक्री फार्ममध्ये दर नमूद करुन लिफाफा क्रं. २ मध्ये घालणे आवश्यक आहे.

निवीदा फॉर्ममध्ये दिलेल्या विहित नमून्यात दशविलेले दरच ग्राहय धरले जातील. मोहोरबंद लिफाफा क्रमांक १ व २ वेगळया लिफाफयात घालून सील करावे व त्यावर डाव्या बाजूला निविदा भरण्याऱ्याचे नांव व पत्ता व फोन नंबर याचा उल्लेख खाली लिहावा. तसेच बयाणा रक्कम भरणा केल्याची छायांकीत प्रत लिफाफामध्ये मागील बाजूस लावण्यात यावा. उपरोक्त नमुद केलेल्या विहित पध्दतीनूसार निविदा न पाठविल्यास निविदा ग्राहय समजल्या जाणार नाहीत.

**अटी व शर्ती:-**

१) भोजन ठेक्याचा कालावधी हा मंजूरीचा दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी राहील. तथापी असमाधानकारक सेवा, व्यवस्थापन, असमाधानकारक जेवणाचा दर्जा इ. कारणांमूळे मंजूर ठेका केंव्हाही रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेला आहे. व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.

२) ठेकेदारास अनामत रक्कम म्हणून रु. ५०,०००/- चा भरणा केलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. ठेका संपुष्ठात आल्यावर किंवा रद्द झाल्यावर व महाविद्यालयाचे सर्व साहित्य सुस्थिस्थीत परत केल्यानंतरच अनामत रक्कम परत करण्यात येईल.

३) कराराच्या मुदतीत ज्या प्रकारचे भोजन अन्न पदार्थ पुरविण्याबाबत ठेकेदारांने बांधिलकी पत्करलेली आहे त्यानुसार त्याची अमलंबजावणी करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये हयगय, दुर्लक्ष करण्यात आले तर विहित कालावधी अगोदर ठेका रद्द करण्यात येऊन ठेवण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४) महाविद्यालयाच्या आवारात ठेकेदारांच्या संबधित बाहेरील व्यक्तीना प्रवेश निषिध्द राहील. अपवादात्म परीस्थितीत अधिष्ठातांच्या परवानगीने बाहेरील व्यक्तीना कालमर्यादेत प्रवेश देण्यात येईल.

५) ठेकेदार व त्याच्या कामगारांची वर्तणुक विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्या बरोबर सौजन्यशिल असली पाहीजे. याबाबत एखादी तक्रार सुचना आल्यास ठेकेदारांनी मा. अधिष्ठाता यांना लेखी स्वरुपात कळविणेचे आहे.

६) ठेकेदारास भोजनगृहाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यात येईल उपलब्ध असेल तर फर्निचर ठेकेदारास देण्यात येईल तथापी भोजन व्यवस्थेकरीता लागणारे अतिरीक्त साहित्य उदा. गॅस शेगडया, ताटे, वाटया, ग्लास, पातेली, पाणी साठविण्याचे पिंप व फर्निचर स्वतः आणणेचे आहे.

७) ठेकेदाराने भोजनगृहाच्या इमारतीची विज व पाणी यांचे कनेक्शन स्वतः च्या जबाबदार वर घेणेची आहेत.व त्यांची देयके स्वतः संबंधीत विभागास अदा करणेची आहेत. इमारतीची जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्के.मी. प्रमांणे भाडे आकारणी करुन जागा उपलब्ध करुन दिली जाईल. इमारतीतील भोजनगृहाची देखभाल व स्वच्छता ठेवणे बंधनकारक आहे. इमारतीला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचेल अशी कोणतीही तोडफोड वा फेरबदल करण्याचे नाहीत.

८) विद्यार्थ्यांना दरोजचे जेवण पोटभर देणेचे आहे. आठवडयातील प्रत्येक बुधवारी नेहमीच्या जेवणात एखादा पदार्थ बदल म्हणून देणे आवश्यक राहील. यात अंडाकरी,चिकन , श्रीखंड, बासूंदी, एखादा गोड पदार्थ मर्यादित देणेत यावा. याच बरोबर रविवार फीस्ट देण्यात यावे. फीस्ट पदार्थ मर्यादित ठेवता येतील. मात्र नेहमीचे जेवण पोटभर देणेचे आहे. फीस्ट दिवशी सांयकाळी मेस बंद ठेवण्यास परवानगी राहील.

९) भोजनाचे दरमहाचे पैसे ठेकेदाराने विद्यार्थ्यांकडून घेण्याचे आहे व त्याचा हिशोब त्यांनी ठेवण्याचा आहे. तसेच काही कारणास्तव विद्यार्थ्यांने मासिक भोजनाचे पैसे न दिल्यास ही बाब कमीटीचे निर्दशानास आणणे जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१०) भोजनव्यवस्थे संदर्भात वसतीगृह व्यवस्थापण समिती कार्यरत राहणार असून या समितीशी ठेकेदाराने समन्वय ठेवण्याचा आहे. शक्यतो विद्यार्थी प्रतीनिधी भोजन व्यवस्थेबाबत ज्या सुचना देतील त्याची योग्य प्रकारे अम्मलबजावणी ठेकेदाराने करणेची आहे.

११) ठेका मंजूर झाल्यानंतर ठेकेदाराने महाविद्यालय प्रशासनाशी रक्कम रु. १०० च्या स्टॅप पेपरवर रितसर करारनामा करुन देण्याचा आहे. त्यानंरच ठेका सुरु करण्याची अनुमती देण्यात येईल.

१२) अन्न व प्रशासन विभाग, महानगरपालिका व इतर शासकीय खात्याचे निरिक्षक व अधिकारी आल्यास त्यांना योग्य ती माहिती देणेची असुन कायदेशीर कागदपत्रेही देणेची जबाबदारी ठेकेदाराची आहे.

१३) सदर ठेका नियमाप्रमाणे मिळाल्यानंतर अन्व व प्रशासन विभाग, महानगरपालीका यांच्या कडून आवश्यक असणारा सदर जागेत मेस व कॅन्टीन चालवविण्याचा परवाना आपण स्वतःच्या जबाबदारीवर काढणेचे आहे.

१४) वैद्यकिय शिक्षण व संशोधन मुंबई संचालनालय यांच्या आदेशानुसार मेस /कॅन्टीन रुग्णालयीन आवारात २४ तास चालु ठेवणेचे आहे.

१५) विद्यार्थ्यानी ( महिला) वसतिगृहाच्या ठिकाणी मेस व कॅन्टीनचा ठेका देण्याचे असल्याने सदर ठिकाणी फक्त महिलांनाच ठेका देण्यात येईल. ज्या ठेकेदाराचा ठेका महिला वसतिगृहाकरिता मंजूर करावयाचा आहे.त्या ठेकेदाराने उपरोक्त अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी पुरुष कर्मचारी यांचा वावर होणार नाही.यांची संबंधीत महिला ठेकेदारांनी दक्षता घेणेची आहे.

१६) मेस /कॅन्टीन येथे नेमण्यात येणा-या कर्मचारी यांना मिनीम्म वेजेस ॲक्ट नूसार वेतन संबंधीत ठेकेदारानी देणेचे आहे. त्या बाबत या महाविद्यालयाच्या कार्यालयाकडे कोणतेही अभिवादन विचारात घेतेले जाणार नाही यांची संबंधीतांनी नोद घ्यावयाची आहे.

१७) नियूक्त ठेकेदाराने त्यांचे आयकर , सेवाकर, विक्रीकर, जी.एस.टी. बाबत वेळोवेळी कार्यवाही पुर्ण करण्याची असून मागिल तीन वर्षाच्या एप्रिल-दि. ३१/०३/२०१९ पर्यत संबंधीतांचे इनकम टॅक्स रिटर्न फाईल झाल्याच्या प्रती तांत्रीक लिफाप-यासोबत सादर करण्याच्या आहेत.

१८) मेस/व कॅन्टीन च्या ठिकाणी कोणीही व्यक्ती मद्यप्राशन ,धुम्रपांन केलेले आढळल्यास त्याच्यावरती योग्य ती कार्यवाही करुन ठेका रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांचे कडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१९) मेस व कॅन्टीन चा ठेका घेणा-यांने तेथे कोणत्याही स्वरुपात बाल कामगारांची नियुक्ती करता येणार नाही.तसे आढळल्यास संबंधीतांना बाल कामगार कायदा ॲक्ट अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

( Children labour act probihition and regulation at 1986 )

२०) सदर मेस व कॅन्टीन ठेका चालविण्याबाबतचे सर्व अधिकार विद्यार्थी परिषदेकडे राखुन ठेवले आहेत.

२१) विद्यार्थीनी वसतिगृहाच्या ठिकाणी मेस/कॅन्टीन चा ठेका देणेचाअसल्याने सदर ठिकाणी फक्त महिलांनाच मेस/ कॅन्टीन चालविणा-यानाच मेस /कॅन्टीन चा ठेका देण्यात येईल.

२२) ज्या ठेकेदाराचा ठेका विद्यार्थीनी महिला वसतिगृहाकरीता मंजूर करण्याचा आहे. त्या ठेकेदारांनी उपरोक्त अटीचे तंतोतंत पालन करण्याचे आहे.सदर ठिकाणी पुरुष कर्मचारी यांचा वावर होणार नाही यांची संबंधीतांनी दक्षता घेणेची आहे.

मुळ कागदपत्रे ठेकेदारांनी स्वाक्षाकिंत करुन परत करण्याचे आहे. असे कागद फुल साईज लखोटयात घालून ते सिल करण्यात यावे लखोटयावर **मेस ठेका दरपत्रक** असे नमुद करुन तो मा.अधिष्ठाता,राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैघकीय महाविघालय,सीपीआर हॉस्पिटल कोल्हापूर यांना अग्रेषित करावा. लखोटयाखाली प्रेषक ठेकेदाराचे नाव लिहिण्यात यावे. दरपत्रक दुस-याना हस्तातरीत करता येणार नाही. हस्तातरीत दरपत्रक रदद समजण्यात येईल.

वरील सर्व नियम व अटी मी/ आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून, त्या मला / आम्हाला पूर्णपणे मान्य असुन ठेका अस्तीत्वात असेपर्यंत माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक राहतील.

***टिपः- दिनांक २७ /१२/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यत मेस ठेका फॉर्म जमा करावेत.***

दिनांकः ...........

ठिकाणः-

सही व नाव

**( सदरच्या फॉर्म दुस-यास हस्तांतरीत करता येणार नाही)**